# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग


जळगाव दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवारंग युवक महोत्सवाचे सर्वोत्कृष्ट विजेतेपद के.सी.ई.सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय, जळगावच्या संघाने पटकावले असून अमळनेरच्या खान्देश शिक्षण मंडळाचे प्रताप महाविद्यालयाला उपविजेतेपद प्राप्त झाले.

दि.१४ फेब्रुवारी पासून विद्यापीठाच्या प्रांगणात सुरु झालेल्या युवारंग युवक महोत्सवाचा शनिवार, दि.१६ फेब्रवारी रोजी अत्यंत जल्लोषात पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सिनेकलावंत व दिग्दर्शक योगेश कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर युवारंगचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील, डर्बीन विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो.ओलु ओलुगबरा, कुलसचिव भ.भा.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे, समन्वयक प्रा.अजय पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना योगेश कुलकर्णी यांनी अहिराणी भाषेतून विद्यार्थ्यांशी काही वेळ संवाद साधला. बहिणाबाई आणि बालकवी यांचे नाव घेतल्याशिवाय मराठी साहित्य, भास्कराचार्यांचे नाव घेतल्याशिवाय गणितशास्त्र आणि स्मिता पाटील यांचे नाव घेतल्याशिवाय चित्रपटातील अभिनय परिपूर्ण होऊ शकत नाही. एवढी मोठी परंपरा खानदेशाला लाभली आहे असे मत व्यक्त केले. विद्यापीठाच्या युवक महोत्सवातूनच मला करिअरचा मार्ग प्राप्त झाला. नंदुरबार येथे झालेल्या महोत्सवात कथाकथनात सुवर्णपदक मिळाले. त्या आधी एकांकिका स्पर्धेत पारितोषिके मिळाली याची आठवण करुन देत एन.सी.सी.च्या शिबिरातून इतर भाषांचे बाळकडू मिळाले. त्यामुळे मला पोलिओची राष्ट्रीय पातळीवर जाहिरात करता आली. यातून आत्मविश्वास वाढला, दोन चित्रपट काढले आणि `मोल` अहिराणी भाषेतील तिसरा चित्रपट काढला. आता पुढच्या चित्रपटात खानदेशात कलावंतांना नक्की संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल असा शब्द कुलकर्णी यांनी यावेळी दिला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अत्यंत अल्पकालावधीत उत्तम प्रगती केली याचा माजी विद्यार्थी म्हणून अभिमान असल्याचाही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी कलावंत म्हणून जसे मोठे व्हा, तसे माणूस म्हणूनही मोठे व्हा अशी अपेक्षा व्यक्त करुन आपल्या काळात असे महोत्सव नसल्यामुळे गायक व नाटय अभिनेता होण्याची संधी मिळाली नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी `एक बार मैने कमिटमेंट कर दी तो उसके बाद मै खुद की भी नही सुनता` असा डायलॉग मारला तेव्हा विद्यार्थ्यांनी प्रचंड टाळयांचा प्रतिसाद दिला. कार्याध्यक्ष दिलीप पाटील यांनी या महोत्सवातून शिस्तीचा आदर्श नमुना कलावंतांनी घालून दिला याबद्दल आनंद व्यक्त करुन सामाजिक बांधिलकी अंगी बाळगण्याचे आवाहन केले. प्रो.ओलु ओलुगबरा यांनी देखीम मनोगत व्यक्त करताना भारतातील संगीत आणि भारतातील शिक्षक परंपरेचा आवर्जुन उल्लेख केला. नायजेरियात भारतातील शिक्षकांची संख्या मोठी आहे आणि ते उत्तम शिकवतात त्यामुळेच आम्ही घडलो असे सांगितले.

प्रारंभी कुलसचिव भ.भा.पाटील यांनी प्रास्ताविकात या महोत्सवातील युवा कलावंतांच्या सादरीकरणाबद्दल आनंद व्यक्त केला. संघ व्यवस्थापकांच्या वतीने प्रा.प्रिया कुरकुरे, प्रा.जी.आर.ढेमरे, विद्यार्थ्यांच्या वतीने सागर शितोळे, मेघना वळवी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राध्यापक प्रतिनिधी विलास चव्हाण, प्रा.राम पेटारे यांचा सत्कार करण्यात आला. कर्मचारी प्रतिनिधी म्हणून प्रमोद चव्हाण, प्रभाकर पाटील व राजू सोनवणे यांचाही सत्कार करण्यात आला. पारितोषिक विजेत्यांची यादी प्रा.विलास चव्हाण यांनी वाचली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.विजयप्रकाश शर्मा, माधव कदम व प्रा.राजश्री नेमाडे यांनी केले. प्रा.सत्यजित साळवे यांनी आभार मानले. मंचावरील सर्व वक्त्यांनी पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तिव्र निषेध करुन शहीद जवानांना आपल्या भाषणातून आदराजंली वाहिली.

या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणेः-

**(१) संगीत विभाग**

**(अ) शास्त्रीय गायन-** जिजामाता महाविद्यालय, नंदूरबार (प्रथम), मु.जे.महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

**(ब) शास्त्रीय वादन (तालवाद्य)-** विद्यापीठ प्रशाळा कबचौ उमवि (प्रथम), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

**(क) शास्त्रीय वादन (सुरवाद्य)-** पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (प्रथम), मु.जे.महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), विद्यापीठ प्रशाळा कबचौ उमवि (तृतीय),

**(ड) सुगम गायन (भारतीय)-** मु.जे. महाविद्यालय,जळगाव (प्रथम), जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट,जळगाव (द्वितीय), बी.पी.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव (तृतीय)

**(इ) सुगम गायन (पाश्चात्य)-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट,जळगाव (तृतीय)

**(ई) समुहगीत (भारतीय)-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), पु.ओ.नाहाटा कॉलेज, भुसावळ (द्वितीय), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

**(फ) समुहगीत (पाश्चिमात्य)-** प्रताप महाविद्यालय,अमळनेर (प्रथम), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (द्वितीय), मु.जे.महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ग) लोकसंगीत-** मु.जे.महाविद्यालय, जळगाव (प्रथम), प्रताप महाविद्यालय,अमळनेर (द्वितीय), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

**(घ) भारतीय लोकगीत-** पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (प्रथम), मु.जे.महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

**(२) नृत्यकला**

**(अ) समुह लोकनृत्य-** मु.जे. महाविद्यालय,जळगाव (प्रथम), कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जामनेर (द्वितीय), पी.के.कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

**(ब) शास्त्रीय नृत्य-** मु.जे. महाविद्यालय,जळगाव (प्रथम), झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे (द्वितीय), शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(३) साहित्य कला**

**(अ) वक्तृत्व स्पर्धा-** मु.जे. महाविद्यालय,जळगाव (प्रथम), डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, धुळे (द्वितीय), बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ब) वादविवाद स्पर्धा-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे (तृतीय),

**(क) काव्यवाचन स्पर्धा-** मु.जे.महाविद्यालय, जळगाव (प्रथम), जी.टी.पाटील महाविद्यालय, नंदुरबार (द्वितीय), किसान महाविद्यालय, पारोळा (तृतीय)

**(४) नाटयकला**

**(अ) विडंबन नाटय-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), मु.जे.महाविद्यालय,जळगाव (द्वितीय), डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (तृतीय)

**(ब) मुकनाटय-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, जळगाव (द्वितीय), पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

**(क) मिमिक्री -** डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय,धुळे (प्रथम), झेड.बी.पाटील, महाविद्यालय.धुळे (द्वितीय), रजनीताई देशमुख महाविद्यालय, भडगाव (तृतीय)

**(५) ललित कला**

**(अ) रांगोळी स्पर्धा-** मु.जे.महाविद्यालय,जळगाव (प्रथम), प्रताप महाविद्यालय, अमळनेर (द्वितीय), कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव (तृतीय)

**(ब) चित्रकला स्पर्धा-** आय.एम.आर.जळगाव (प्रथम), कॉलेज ऑफ फार्मसी, शहादा (द्वितीय), धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (तृतीय)

**(क) कोलाज-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर (द्वितीय), पुज्य साने गुरुजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा (तृतीय)

**(ड ) व्यंगचित्र-** कॉलेज ऑफ फार्मसी, शहादा (प्रथम), श्री.काकासाहेब हिरालाल मगनलाल चौधरी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार (द्वितीय), केसीईचे पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, जळगाव (तृतीय)

**(इ) क्ले मॉडेलिंग-** मु.जे.महाविद्यालय,जळगाव (प्रथम ), डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे (द्वितीय), बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ई) स्पॉट पेटींग-** मु.जे.महाविद्यालय.जळगाव (प्रथम), पु.ओ.नाहटा महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), प्रताप महाविद्यालय, अमळनेर (तृतीय)

**(उ) फोटोग्राफी-** आय.एम.आर., जळगाव (प्रथम), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), इ ाेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे (तृतीय)

**(ऊ) इन्स्टॉलेशन-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), कॉलेज ऑफ फार्मसी, शहादा (तृतीय)

**(ए) मेहंदी-** कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा (प्रथम), डी.एस.पाटील महाविद्यालय, एरंडोल (द्वितीय), डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, धुळे (तृतीय)

**कलाप्रकारनिहाय विजेतेपद**

| | | |
|---|---|---|
| **(१) संगीत** | - | प्रताप महाविद्यालय,अमळनेर |
| **(२) नृत्यकला** | - | मु.जे.महाविद्यालय, जळगाव |
| **(३) साहित्यकला** | - | मु.जे.महाविद्यालय, जळगाव |
| **(४) नाटयकला** | - | प्रताप महाविद्यालय, अमळनेर |
| **(५) ललित कला** | - | प्रताप महाविद्यालय, अमळनेर |

**सर्वोत्कृष्ट**

**प्रथम -** मु.जे.महाविद्यालय,जळगाव (डॉ.जी.डी.बेंडाळे स्मृतीचषक)

**द्वितीय -** प्रताप महाविद्यालय,अमळनेर (कै.कुसुमताई चौधरी स्मृतीचषक)

मु.जे.महाविद्यालयाने ९ प्रथम, चार द्वितीय व एक तृतीय पारितोषिक पटकावून सर्वसाधारण विजेतपद पटकावले तर प्रताप महाविद्यालय, अमळनेरने ८ प्रथम, दोन द्वितीय व एक तृतीय पारितोषिक प्राप्त करुन सर्वसाधारण उपविजेतपद प्राप्त केले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,